# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.09.2025** **वारःसोमवार**

---

१. पंतप्रधान भाजपा खासदारांच्या प्रशिक्षण कार्यशाळेला आज संबोधित करणार
२. पूरग्रस्त पंजाबची पाहणी करण्यासाठी पंतप्रधानांचा उद्या दौरा
३. जीएसटी सुधारणा ग्रामीण उद्योजकता आणि अन्न प्रक्रिया क्षेत्राला बळकटी मिळेल, सहकार मंत्रालयाची अपेक्षा
४. गुजरात आणि राजस्थानला मुसळधार पावसाचा इशारा आणि
५. आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारत अजिंक्य

**पंतप्रधान**

भाजपा खासदारांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या सांगता समारंभाला पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी दिल्ली इथं आज संबोधित करणार आहेत. उद्या होणाऱ्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेचे मूलभूत प्रशिक्षण खासदारांना देण्यासाठी कालपासून दोन दिवसांची कार्यशाळा सुरू झाली. पंतप्रधान सर्व प्रशिक्षण सत्रांमध्ये उपस्थित होते. अशी माहिती किरण रिजिजू यांनी दिली. संयुक्त लोकशाही आघाडीतील इतर पक्षांचे खासदारही आज कार्यशाळेत सहभागी होतील. वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी सुधारणांवरील ठराव या कार्यशाळेत सादर केला आणि भाजपा संसदीय सदस्यांनी त्याला एकमताने मंजुरी दिली.

पंजाबमधील पुरस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पंजाबच्या दौऱ्यावर जाणार आहेत. स्थानिक पुरपरिस्थितीचे मूल्यांकन आणि बाधित नागरिकांना त्वरित मदत मिळण्याच्या उद्देशानं ते पाहणी करतील अशी माहिती पंजाब भाजपाचे अध्यक्ष सुनील जाखड यांनी समाजमाध्यवरील संदेशात दिली आहे. पंतप्रधान या परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी या भागाला नुकतीच भेट दिली. तसंच या भागाची पाहणी करण्यासाठी दोन केंद्रीय आंतर-मंत्रालयीन पथकं तैनात करण्यात आली आहेत.

दरम्यान, पंजाबमधील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत असली तरी आतापर्यंत एकंदर २ हजार गावं आणि साडेतीन लाखांहून अधिक लोक पुरामुळे बाधित झाले आहेत आणि ४६ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. राज्य आपत्ती निवारण दल, सैन्यदल, सीमा सुरक्षा दल आणि आपत्ती निवारण दलाच्या तज्ञांसह

एकत्रितपणे मदत आणि बचाव कार्य करत आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाचे शेकडो 'माझे भारत आपदा मित्र' देखील पूरग्रस्त जिल्ह्यांमधील स्थानिक नागरिकांना मदत करत आहेत. राज्य सरकारने स्थानिक परिस्थितीनुसार आजपासून राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था सुरू करण्याची घोषणा केली आहे.

दरम्यान, दिल्ली सरकारने काल पंजाबच्या पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी ५२ ट्रक्समधून मदत साहित्य पाठवलं आहे. परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत दिल्ली सरकार पंजाबमधील लोकांना मदत करत राहील. असं दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितलं.

**GST**

वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटीमधील व्यापक सुधारणा सहकारी क्षेत्राला बळकटी देतील, उत्पादने अधिक स्पर्धात्मक होतील, उत्पादनांची मागणी वाढेल आणि सहकारी संस्थांचे उत्पन्न वाढवेल. असा विश्वास सहकार मंत्रालयानं काल व्यक्त केला.  जीएसटी सुधारणा ग्रामीण उद्योजकता आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील सहकारी संस्थांना प्रोत्साहन देतील आणि लाखो कुटुंबांना आवश्यक वस्तू परवडणाऱ्या दरांत उपलब्ध होतील देशातील १० कोटींहून अधिक दुग्ध उत्पादकांना फायदा होईल, शाश्वत कृषी प्रणालींना चालना मिळेल आणि लहान शेतकऱ्यांना फायदा होईल. असंही मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे.

**जीएसटीकपातऊर्जा**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं अलीकडेच जीएसटी कर प्रणालीत केलेल्या फेररचनेमुळे अनेक वस्तूंच्या किंमती कमी होणार आहेत. त्याचा ऊर्जा क्षेत्राला विशेषतः नवीकरणीय ऊर्जा उपकरणं स्वस्त झाल्यानं मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. जीएसटी कपातीमुळे सोलर कुकर, पवन ऊर्जानिर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांसाठी फोटोव्होल्टाईक सेल, बायोगॅस संयंत्र, कचऱ्यातून वीज निर्मिती करणारे संच अशा वस्तूंवरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आल्यानं त्या स्वस्त होणार आहेत. परिणामी स्वच्छ ऊर्जेचा अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा असून सर्वसामान्य कुटुंबं आणि उद्योगांसाठीसाठी हरित ऊर्जा  अधिक परवडणारी होण्यी शक्यता आहे.

**डोभाल**

जागतिक व्यापार आणि राजनैतिक संबंधांमध्ये बदल होत असताना, भारत इराणमधील चाबहार बंदरासंदर्भात धोरणनिश्चिती करुन मध्य आशियातील संबंध अधिक दृढ करत आहे असं राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी काल सांगितलं. इराणचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अली अकबर अहमदीयन यांच्याशी काल दूरध्वनीवरुन झालेल्या चर्चेनंतर त्यांनी ही माहिती दिली. दोनही देशांदरम्यानचे प्रादेशिक विकास आणि चाबहार प्रकल्पासह परस्पर सहकार्य याबाबत यावेळी चर्चा झाली. चाबहारमधील शाहिद बहेस्ती बंदर हे ओमानच्या आखातातील महत्वाचं व्यापार केंद्र ठरत असून अफगाणिस्तान आणि मध्य आशिया भागाला थेट संपर्क करण्यात मदत करत आहे. भारतानं २०१४ मध्ये १० वर्षांसाठी या इराणसोबत बंदरातील मालवाहतूक टर्मिनल्स सुसज्ज करण्यासाठी १० वर्षांचा करार केला आहे.

**जपान-एनओए**

जपानचे पंतप्रधान शिगेरु इशिबा यांनी आपण पायउतार होणार असल्याची काल घोषणा केली. दोन मोठ्या निवडणुकांमध्ये झालेल्या पराभवानंतर त्यांनी हे जाहीर केलं. लिबरल डेमोक्रॅटिक पार्टीच्या अध्यक्षपदावरूनही ते राजीनामा देणार आहेत. जपानमध्ये नवीन पंतप्रधानांची नियुक्ती होईपर्यंत इशिबा पंतप्रधान म्हणून कार्यरत राहतील.

**रशिया-निर्बंध**

आयातशुल्कासंदर्भात रशियावर "दुसऱ्या टप्प्यातील" निर्बंध लादण्यास आपण तयार असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं. रशियाने युक्रेनची राजधानी कीववर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला. यामध्ये प्रमुख सरकारी कार्यालये असलेल्या इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत. या हल्ल्यानंतर ट्रंप यांनी काल हा इशारा दिला आहे.

रशिया भारत आणि चीन परस्पर हिताच्या मुद्यांवर द्वपक्षीय संबंध अधिक दृढ करत असल्याचं रशियाचे परराष्ट्रमंत्री सरगी लावारोव यांनी सांगितलं. नुकत्याच तियानजीन इथं पार पडलेल्या शाघाय सहकार्य परिषदेच्या पार्श्वभूमी ते बोलत होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी आयातशुल्क लादल्यानंतर भारत अमेरिकेदरम्यान तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. त्यानंतर भारत आणि रशियासारखा देशांशी संबंध बिघडवल्याबद्द ट्रंप यांनी समाजमाध्यमात खंत व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

**चंद्रग्रहण**

जगभरातील आकाश निरीक्षकांनी काल रात्री रंगलेला खग्रास चंद्रग्रहणाचा सावल्यांचा मनोहर खेळ पाहण्याचा आनंद घेतला. या वर्षातलं हे दुसरं चंद्रग्रहण असल्यानं या ब्लड मून म्हणूनही या पर्वणीला महत्त्व प्राप्त झालं होतं. रात्री ९ वाजून ५७ मिनिटांपासून चंद्रावर सावली पडण्यास सुरुवात झाली, ११ वाजून १ मिनिटांपर्यंत पृथ्वीच्या सावल्यांनी पूर्ण चंद्रबिंब झाकोळून टाकल्यानंतर चंद्रबिंबातून लालसर आभा पसरल्यानं रक्तवर्णी चंद्राचं अर्थात ब्लड मूनचं अद्भूत दृष्य पाहायला मिळालं.

**बिहार**

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री महिला रोजगार योजना सुरू केली आहे. ही योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अनेक प्रचार वाहनांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला आणि योजनेसाठी संकेतस्थळ सुरू केलं. या योजनेअंतर्गत, राज्यातील प्रत्येक कुटुंबातील एका महिलेला तिच्या आवडीचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. आर्थिक मदतीचा पहिला हप्ता म्हणून, थेट लाभ हस्तांतरणाद्वारे १० हजार रुपये दिले जाणार आहे. ग्रामीण विकास विभाग या योजनेसाठी मध्यवर्ती संस्था म्हणून काम करेल अशी माहिती नितीश कुमार यांनी दिली. पुढील सहा महिन्यांत याजनेचे मूल्यांकन केले जाईल. असंही ते म्हणाले.

**<u>हॉकी</u>**

बिहारमध्ये राजगीर इथं झालेल्या आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीतील रोमहर्षक सामन्यात भारतीय संघानं काल गतविजेत्या दक्षिण कोरियाच्या संघावर ४ विरुद्ध एका गोलनं असा विजय मिळवत चौथ्यांदा या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. या विजयामुळं भारतीय हॉकी संघ पुढच्या वर्षी, २०२६ मध्ये नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या FIH पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठीही पात्र ठरला आहे. हॉकी इंडियानं प्रत्येक खेळाडूला ३ लाख रुपयांचं तर सामन्याच्या सहाय्यक चमूला प्रत्येकी दीड लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे.

आशिया चषक विजेत्या भारतीय पुरुष संघाचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अभिनंदन केलं आहे. भारतीय संघानं गेल्या वेळच्या चषक विजेत्या संघाला पराभूत केल्यानं हा विजय आणखी खास असल्याचं पंतप्रधानांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या अभिनंदनाच्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

गुजरात आणि राजस्थानमध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मध्य प्रदेश ओडिशा आणि पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्किम, तामिळनाडू, पुदुचेरी, उत्तराखंड आणि कराईकलमध्येही पावसाची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशातील काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश आणि पंजाबमध्या पुढील तीन दिवस मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. तर आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड, केरळ आणि माहे इथं वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.